# संघर्ष यात्रा

वर्ष ९ वे अंक ४९ वा सोमवार दि.२१ जुलै २०२५ आर.एन.आय. MAHMAR/2016/74758 किंमत :१ रू. पाने :-४ पान-१

# सकारात्मक,विश्लेषणात्मक पत्रकारितेवर माध्यमांनी अधिक भर द्यावा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून पत्रकारांसाठी कार्यशाळा

बीड ।प्रतिनिधी

समृद्ध लोकशाहीसाठी प्रसार माध्यमे, प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. नागरिक व प्रशासनात समन्वय साधण्यासाठी माध्यमे मोलाची जबाबदारी पार पाडत असतात. तरीही माध्यमांनी सकारात्मक, विश्लेषणात्मक पत्रकारितेवर अधिक भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज येथे केले.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह येथे माहिती जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने पत्रकारांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उदघाटन जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. प्रमुख मार्गदर्शक दीपक रंगारी, माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे, प्रा. शिवशंकर पटवारी, प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके यांची उपस्थिती होती. प्रथम मान्यवरांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले, शासन, जिल्हा प्रशासन नागरिकांच्या समस्या, प्रश्न सोडाविण्यासाठी प्रयत्नशील आहे. आता जिल्हा स्तरावर होत



असलेल्या जनता दरबार प्रमाणे तालुका स्तरावर देखील अधिकारी जनता दरबार घेत आहेत. जनतेचे प्रश्न, समस्या सोडवत आहेत. जनमत घडवण्याचे काम माध्यमे प्रभावीपणे करतात. त्यामुळे आजच्या नवमाध्यमाच्या युगात आणि समाज माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता सत्य माहिती जनतेला देण्याची जबाबदारी माध्यमांना पार पाडावी लागणार आहे. तसेच नागरिकांना त्यांच्या कर्तव्याप्रती जागरूक करण्याची जबाबदारीही माध्यमांनी पार पाडणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले. आजच्या या कार्यशाळेतून पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या योजना, सवलत, सोयी सुविधा यांची माहिती होण्यास उपयोग होईल, त्याचाही पत्रकारांनी लाभ घ्यावा, असेही जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्याम टरके यांनी केले. आभारही त्यांनीच मानले. कार्यशाळेबाबत प्रातिनिधिक स्वरूपात संपादक बाळासाहेब फपाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन माहिती आणि महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित पत्रकारांसाठी कार्यशाळेत तज्ज्ञांनी पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता, प्रमाणभाषा लेखन, समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये याबाबत मार्गदर्शन केले.

प्रा. रंगारी यांनी 'वृत्त संकलन आणि संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व' याविषयी मार्गदर्शन केले. मराठी प्रमाणभाषेच्या शुद्धलेखनाचे नियम, शब्दांचा अर्थ, भाषेतील व्याकरणाचा वापर याबरोबरच मराठी भाषा समृद्ध करण्यात विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. वाक्यामध्ये येणारी क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व, दीर्घ, ईकारांत याबरोबरच एकाक्षरी क्रियापद, शब्दयोगी अव्यय, तत्सम आणि तद्भव शब्दांविषयीचे स्पष्टीकरण उदाहरणासह समजावून सांगितले. पत्रकाराने शब्दकोश आणि लेखनकोश याचा वापर करून निर्दोष लिखाण याविषयी मार्गदर्शन केले. विविध शब्दांच्या वाक्यानुसार आणि वेळेनुसार होणारा बदलही त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले.


अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी या विषयांवर प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ.टरके यांनी माहिती दिली. समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये या विषयांवर डॉ. गोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. संक्षिप्तता, थेट आशय, छोटी वाक्ये, शब्दांचे महत्त्व, योग्य मथळा, सातत्याने समाज माध्यमावर लिहा, योग्य हॅशटॅग, थंबनेल, ग्राफिक्स, भाषा आणि टोन

(पान २ वर)

## बीडमधील संपर्क कार्यालयास भेट

### आ.धनंजय मुंडे, रुपाली चाकणकरांसह नेत्यांची उपस्थिती





बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी रविवारी (दि.२०) बीड शहरातील डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीनिमित्त डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते खा.तटकरे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, आमदार विक्रम काळे, आनंद परांजपे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, लतिफ तांबोळी, जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, महिला आघाडीच्या ड. प्रज्ञा खोसरे, रमेश आडसकर, युवा नेते बळीराम गवते, अविनाश नाईकवाडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भेटीदरम्यान आगामी संघटनात्मक कामकाज, पक्ष विस्तार, तसेच स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

## महादेव मुंडे हत्या प्रकरणात कोणाचीही गय केली जाणार नाही

### मुख्यमंत्री फडणवीस यांची विधानसभेत माहिती

बीड । प्रतिनिधी

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्येप्रकरणावर आज विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर माहिती दिली. या प्रकरणाचा तपास मोठ्या प्रमाणात सुरु असून, तंत्रज्ञानाच्या मदतीने १९६ जणांची विचारपूस करण्यात आली आहे. याशिवाय ८३ साक्षीदारांची चौकशी आणि २८६ जणांचे मोबाईल तपासण्यात आले असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.



मुख्यमंत्री म्हणाले की, खुल्या मैदानात ही घटना घडल्याने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळणे कठीण गेले आहे. मात्र, एक महिला दीड महिन्यांनी पुढे आली असून तिच्याकडून तपास सुरु आहे. या प्रकरणात डमी डेटा तपासला जात आहे. महादेव मुंडे यांच्या पत्नीच्या आक्रोशाची आपण पूर्णपणे जाणीव ठेवतो, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात कुणालाही पाठिशी घालणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

(पान २ वर)

## प्रेयसीने भेटायला बोलवल झाला मृत्यू

बीड ।प्रतिनिधी

प्रेम संबंधातून अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना बीडमधील गेवराई तालुक्यातील गंगावाडी येथे घडली आहे. तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी पाच जणांवर तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



असून आता यात खूनाचे कलम वाढविले जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

शिवम काशिनाथ चिकणे असे २१ वर्षीय तरुणाचे नाव असून तो अभियंत्रिकीचे शिक्षण घेत होता. शिवमचे गावामधीलचं एका मुली सोबत प्रेमसंबंध होते. प्रेयसीने घरी बोलावले असताना त्यावेळी अचानक नातेवाईक तेथे आले आणि त्यांच्यात वाद झाला. दरम्यान मुलीच्या नातेवाईकांनी शिवमला रस्त्यात गाठून लाठ्या-काठ्याने बेदम मारहाण केली. मारहाणीनंतर शिवमला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यानच त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी मुलीच्या वडिलांना अटक करण्यात आली असून इतर आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

## बीड कारागृह कैद्याच्या अंडरवेअरमध्ये निघाला चिरलेला रबरी बॉल

बीड । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून बीड जिल्हा कारागृह सतत चर्चेचा विषय ठरत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि त्याची टोळी सध्या याच कारागृहात शिक्षा भोगत आहे. वाल्मिक कराडला कारागृहात व्हीआयपी ट्रीटमेंट दिली




जात असल्याचा आरोप झाल्यानंतर या कारागृहाची राज्यभरात चर्चा रंगली होती. तसेच कराड गँग आणि गित्ते गँग यांच्यात तुरुंगातच गँगवॉर झाल्याची घटना काही महिन्यांपूर्वी समोर आल्याने एकच खळबळ उडाली होती. आता बीड जिल्हा कारागृह पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

(पान २ वर)

# संपादकीय

## धगधगती तलवार..!


लोकशाहीर अण्णाभाऊ साठे. सर्वसामान्यांच्या जीवनसंघर्षाची चूड पेटविणारा हा जनसामान्यांमधील असामान्य प्रतिभावंत. ज्याने जगणे, जगण्यामागच्या वेदना आणि जगण्यामागचे तत्त्वज्ञान शब्दबद्ध केले. ज्याने विश्वरूपी गणाला सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी आवाहन केले. लोककलेच्या क्षेत्रातील तमाशा आणि त्यातील गण, गवळण, बतावणी आदी लोकशैलींची मोडणी करून त्यात नव्या युगाचा आशय भरला. असा युगप्रवर्तक शाहीर म्हणजेच अण्णाभाऊ साठे! कथा, कादंबरी, लोकनाट्य, आत्मकथन, लोकगीत अशा मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रातील विविध दालनांना ज्यांच्या लोकप्रतिभेचा स्पर्श झाला, अशा अण्णाभाऊंच्या योगदानाबद्दल थोर साहित्यिक प्र. के. अत्रे यांनी म्हटले आहे, अण्णाभाऊ साठे यांच्या कथेचे एका वाक्यात वर्णन करावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, ही जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाची कथा आहे. ही कच खाणारी, हार मानणारी माणसं नाहीत. या सर्वांना मानाने जगायचे आहे आणि आक्रमक वृत्तींशी निकराने लढून त्या सामन्यात त्यांना जिंकायचेही आहे. वैयक्तिक दु:खांचा विचार न करता, विचार कार्य व प्रतिभा यांच्या मदतीने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे अण्णाभाऊ निश्चितच प्रेरणास्थानी असणारे असे होते. रेठऱ्याच्या जत्रेत त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले. त्या भाषणाच्या परिणामस्वरूप अण्णा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेऊ लागले. चळवळीत सामील होऊन लोकनाट्यांत त्यांनी छोटी–मोठी कामे केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीसह संयुक्त महाराष्ट्र चळवळीत, तसेच गोवा मुक्ती संग्रामाच्या वेळीही त्यांनी जनजागृतीचे काम केले. एक कलाकार म्हणून तसेच एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणूनही ते प्रत्येक उपक्रमांत, आंदोलनांत सहभागी होत असत. 'चले जाव' चळवळीच्या काळात वाटेगावातही बर्डे गुरुजींच्या नेतृत्वाखाली अनेक घडामोडी सुरू होत्या. अण्णाभाऊ त्यात सामील असल्याने त्यांच्यावर वॉरंट निघाले. परिणामी त्यांनी कायमचे घर सोडले. पुढे त्यांना तत्त्वज्ञानाची, विचारांची एक दिशा मिळत गेली आणि त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे पूर्ण वेळ काम करायला सुरुवात केली. यावेळी शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर हेदेखील त्यांच्या समवेत होतेच. या माध्यमातूनच त्यांच्या लिखाणाला सुरुवात झाली. लावण्या, पोवाडे, पथनाट्ये म्हणून त्यांच्या ललित साहित्याची पूर्वतयारी होती. त्यांनी एकूण सुमारे १५ वगनाट्ये लिहिली व त्यातूनच त्यांना प्रसिद्धीही मिळत गेली. अण्णाभाऊंचे साहित्य क्षेत्रातील कार्य एखाद्या दीपस्तंभासारखे होते. व्यक्तिगत जीवनातील उपेक्षेचा झंझावात आणि आर्थिक विपन्नावस्थेचे वादळ झेलूनही अण्णाभाऊ सतत सर्वसामान्यांसाठी संघर्षरत राहिले. वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान मांडत साम्यवादाचे प्रवर्तक म्हणून कार्यरत राहिले. त्यांचे जीवन खरोखरच प्रेरणादायी होते.

# मोडी लिपी:मराठी भाषेचे मूलरूप

मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्तीसंदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. अलककार– श्री कृष्णकुमार निकोडे गुरुजी ही ज्ञानवर्धक माहिती येथे देत आहेत.

मोडी लिपी हात न उचलता लिहिली जाते, त्यामुळे वेगाने लिहिणे सोपे जाते. यात अनेक शब्दांची लघुरुपे वापरून कमीतकमी ओळीत सारांश लिहिला जातो. यातली अक्षरांची वळणे गोलाकार असतात, त्यामध्ये देवनागरीच्या विपरीत काना खालून वर जातो. यामुळे पुढचे अक्षर चटकन लिहिता येते. तसेच प्रत्येक अक्षराची सुरुवात आणि शेवट डोक्यावरच्या रेषेवर होते. मोडी लिपीत चिटणीसी, महादजीपंती, बिवलकरी, रानडी अशी वळणे प्रसिद्ध आहेत. पुढे घोसदार वळण येऊन त्याचा भारतातल्या इतर भागातही प्रसार झाला असे मानले जाते. असंख्य मराठी ऐतिहासिक कागदपत्रे मोडी लिपीत असून इतिहास संशोधनाकरिता मोडी जाणकारांची कमतरता भासते. मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्ती संदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

मोडी लिपीत एक पत्र सवाई माधवराव पेशवे यांनी सेनापती महादजी शिंदे यांस दि.३०–१२–१७८४ रोजी लिहिले होते. मोडी लिपीच्या उगमाबद्दल अनेक मते व मतभेद आहेत. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे व डॉ.भांडारकरांच्या मते हेमाडपंताने ही लिपी श्रीलंकेतून आणली. परंतु चांदोरकरांच्या मते ती अशोककालातील मौर्यी– ब्राह्मीचाच एक प्रगत प्रकार आहे. वाकणकर व वालावलकरांच्या मते मोडी लिपी ही ब्राह्मी लिपीचाच एक प्रकार असून हात न उचलता लिहिण्याच्या तिच्या वैशिष्ट्यामुळे इतर लिपींपेक्षा वेगळी झाली आहे. ती श्रीलंकेतून आणली गेली असावी अथवा मौर्यी लिपीवरून विकसित झाली असावी, हे म्हणणे त्यांना मान्य नाही. ही लिपी महाराष्ट्रात कमीत कमी ९०० वर्षे वापरात आहे. सर्वांत जुना उपलब्ध मोडी लेख इ.स.११८९ मधील आहे. ते पत्र पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात आहे. ती अल्पप्रमाणात का होईना सन १९५०पर्यंत लिखाणात प्रचलित होती. शेवटच्या २–३ शतकात या लिपीत अनेक फेरबदल झालेले आहेत. साधारण इ.स.१७००च्या सुमारास चिटणिसी आणि वळणे ही पूर्णपणे प्रगत झाली. यानंतर त्यात फारसे बदल दिसून येत नाहीत. ऐतिहासिक कागदपत्रांतील ही लिपी क्लिष्ट आणि वाचण्यास कठीण असते. ती पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती, असे मानले जाते. पेशवे यांच्या दप्तरातील कागदपत्रे, दस्ताऐवज पाहिले असता त्या उत्कर्षाची कल्पना येते. सुबक अक्षर, दोन ओळीतील समान अंतर, काटेकोर शुद्धलेखन हे या



लेखनाचे वैशिष्ट्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ ते उत्तर पेशवाई या काळांतील मोडीवाचनातून मराठी भाषेतील स्थित्यंतरे लक्षात येतात व मराठी भाषेचा प्रवास अभ्यासता येतो. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताप्रमाणे ज्ञानेश्वरी लिहिली जाण्याच्या काळात मोडी संकल्पना महाराष्ट्रात येत होती. याच काळात पहिले मुस्लिम आक्रमण भारतात होत होते. लिखाणाकरिता कागदाचा वापर हा मुस्लिमांनी भारतात सुरू केला असावा, कारण कागज हा फार्सी शब्द असून या अर्थाचा संस्कृत शब्द अस्तित्वात नाही. इतिहासाचार्य राजवाडे ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा हवाला देतात. देवनागरी अक्षरे आडव्या, उभ्या आणि टोकदार रेषांचा अवलंब करतात, त्यामुळे लिखाणाच्या हस्तलिखित प्रति बनवताना वेग कमी होतो. तर शिकस्त्याप्रमाणे गोलाकार व एकमेकांना जोडली जाणारी वळणे वापरून मोडी हस्तलिखिताचा वेळ वाचवत होती. विराम चिन्हांचा वापर इंग्रजी भाषाशी ओळख झाल्यानंतरच भारतीय लिपींत सुरू झाला.

भारतीय टपाल सेवेच्या माय स्टँप योजने अंतर्गत मोडी लिपी राखण्यास एक प्रयत्न केला आहे. चित्रात मराठी हे मोडी लिपीमध्ये छापले गेले आहे. ती १३व्या शतकापासून २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. महादेव यादव व रामदेव यादव यांच्या राज्यकालात– १२६०–१३०९मध्ये हेमाडपंत– खरे नांव हेमाद्रि पंडित या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. छपाईस अवघड असल्यामुळे मोडी लिपीचा वापर मागे पडला आणि बाळबोध–देवनागरी लिपीचा वापर सार्वत्रिक सुरू झाला. हा वापर सक्तीने करण्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यानंतर मात्र दि.१७ जुलै १८०२ रोजी मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले. म्हणूनच आजचा १७ जुलै हा दिवस मोडी लिपीचा प्रथम मुद्रण दिन दरवर्षी साजरा होतो. इ.स.१८०२मध्ये विल्यम कॅरे या मिशनऱ्याने पंडित वैजनाथ यांच्या मदतीने पहिला मोडी लिथोग्राफ श्रीरामपूर बंगाल येथे बनवला. रघु भोसल्यांची वंशावळी, मराठी भाषा व्याकरण, मराठी कोष, नवा करार सन– १८०७. या ग्रंथांची मोडी लिपीत छपाई केली गेली. ए.के. प्रियोळकर यांनी मोडी छपाईचा इतिहास लिहिला. मोडी लिपीचे चार कालखंडांत वर्गीकरण केले आहे– यादवकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन आणि आंग्लकालीन. यादवकालीन मोडी लिपी लिखाणात अक्षरे एकमेकांच्या अगदीच जवळ व उभी काढली गेली. तीच शिवकालीन शैलीत किंचित उजवीकडे झुकलेली दिसतात. या लिपीला तिरकस वळण, अधिक वर्तुळाकार आणि सुटसुटीत अक्षरे लिहिण्याचा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी सुरु केला होता. तोपर्यंत लिपी ही टाकाने लिहिली जात असे. असाच प्रयत्न पुढे चालू ठेवून पेशवेकालीन शैलीत ती अगदीच रेखीव, गोलाकार, तिरकस आणि सुटसुटीत लिहिली जाऊ लागली. पेशवेकाळातील लिखाण बोरुने होत असे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज राजवटीत फाऊंटन पेनचा वापर सुरू झाला. बोरुने जी प्रत्येक अक्षराला जाडी–रुंदी आणि टोक येत असे, ते या फाऊंटन पेनच्या वापरात शक्य नसल्याने मोडी लिपी अगदीच गुंतागुंतीची व किचकट दिसू लागली. फाऊंटन पेनचा एकच फायदा होता, तो म्हणजे त्यात शाई बराच वेळ टिकून राही. म्हणून सध्याचे मोडी लेखक फाऊंटन पेनच्या कॅलिग्राफीच्या निब्सचा वापर करतात आणि लिखाणात काही प्रमाणात पेशवेकालीन मोडी लिपीचे सौंदर्य आणण्याचा प्रयत्न करतात. अलीकडे कर्नाटकात ९व्या शतकातील काही आढळलेले शिलालेख हे मोडी लिपीत असून लिपी शिकस्तामधून निर्माण झाली, या मताचे खंडण करतात. १०व्या शतकात नस्तलीकमधून शिकस्ते लिपी जन्मास आली. शिकस्ता म्हणजे मोडकी नस्तलीक होय. यावरून स्पष्ट होते की मोडी लिपीची संकल्पना ही शिकस्तामधून आली नव्हती. कारण महादेवराव, रामदेवराव किंवा हरपालदेवराव यादवांच्या कारकिर्दीत मराठी लोकांचा श्रीलंकेशी संपर्क आला नव्हता. मात्र मोडी लिपीचे नागरी, गुर्जरी म्हणजे महाजनी आणि बंगाली लिप्यांशी साधर्म्य आहे, हे कोणीही ठामपणे सांगू शकेल.

## पान एक वरून

### बीड कारागृह कैद्यांच्या...

वाल्मिक कराड शिक्षा भोगत असलेल्या बीड जिल्हा कारागृहात एका आरोपीकडून गांजासदृश पदार्थ सापडल्याने खळबळ उडाली आहे. त्यामुळे कारागृहामध्ये अंमली पदार्थांची तस्करी कोण करतंय? याबाबत विविध तर्कवितर्कांना ऊत आला आहे. संबंधित न्यायालयीन बंदीकडून गांजासदृश पदार्थ जप्त करण्यात आला असून, दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत जप्तीची कारवाई आणि पंचनामा करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट दिल्याच्या आरोपांमुळे बीड जिल्हा कारागृह चर्चेत आले होते. आता त्याच कारागृहात गांजासदृश पदार्थ सापडला आहे. सुभेदार बलभीम चिचाणे आणि पोलीस हवालदार अब्दुल वाजेद अब्दुल अजिज हे कर्तव्यावर असताना बराक क्रमांक ७ मध्ये न्यायालयीन कोठडीत असलेल्या बंदी अक्षय ऊर्फ चिंटू मिठ्ठू गायकवाडची हालचाल संशयास्पद वाटली. त्याची झडती घेतली असता, त्याच्या अंडरविअरमध्ये रबरी फिकट आकाशी रंगाचा चिरलेला बॉल आढळून आला, ज्यामध्ये गांजासदृश पदार्थ सापडला. तसेच, त्याच्या पँटच्या खिशात असलेल्या पुडीत हिरवट रंगाचा पाला, बारीक भुरकट पदार्थ, हिरवट रंगाची फुले, बिया, बोंडे आणि काड्या असा अंमली पदार्थसदृश मुद्देमाल मिळाला. हा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अक्षय गायकवाडविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे बीड जिल्हा कारागृह पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

### सकारात्मक, विश्लेषण...

आदी बाबींवर मार्गदर्शन केले.


कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयावर प्रा. पटवारी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता पूर्वीची पत्रकारिता, भाषा, कला, शास्त्र, संस्कृती, राष्ट्रीय –प्रादेशिक वृत्तपत्रे यांची स्थिती आणि सद्यस्थितीत वापरात येत असलेली सॉफ्टवेअर, ॲप्स आदीबाबतीत सविस्तर माहिती दिली. या कार्यशाळेसाठी पत्रकारांच्या संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी, शहरासह, जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘फार्मर आय डी’चे जाचक अटी मुळे अनेक शेतकरी पिक विम्या पासून वंचित राहणार

## फार्मर आय डी ची जाचक अट रद्द करण्याची मागणी

किल्लेधारूर । प्रतिनिधी

नवीन शेती खरेदी विक्री झालेल्या शेतकऱ्यांचा फार्मर आयडी निघत नसल्याने व २०१९ नंतरच्या शेतकऱ्यांना अडचणी येत असल्याने ही शेतकरी पिक विमा भरण्यापासूनही वंचित राहणार असल्याने नवीन खरेदी करीचे व्यवहार झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ त्यांच्या नावे जमीन करून त्यांचा फार्मर आयडी देण्याची व्यवस्था करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राहुल शितोळे यांनी केली आहे




नवीन फेरफार झालेल्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी निघू शकत नाहीत. फार्मर आयडी साठी वापरला जाणारा डाटा. हा खूप पूर्वीचा जुना असल्यामुळे. नवीन फेरफार झालेल्या शेतकऱ्यांचे. फार्मर आयडी तयार होत नाहीत. सरकारने फार्मर आयडी कंपल्सरी केल्यामुळे पिक विमा भरता येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार हे नक्की. यासाठी फार्मर आयडी सक्तीचे करणे चुकीचे आहे नियमांमध्ये शितलता देऊन शेतकऱ्यांना पिक विमा भरण्यास मार्ग मोकळा करून द्यावा तसेच जुन्या शेतकऱ्यांनी शेत जमिनी विकल्या किंवा फेर ची नोंद केली जावी त्यांचे पूर्वीचे रेकॉर्ड आजही त्यांच्या नावावर दाखवत आहे त्यामुळे नवीन शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार होत नाही

फार्मर आयडी नसल्यामुळे शेतकरी पिक विमा भरण्या पासून व इतर सवलती पासून वंचित राहत आहे त्यामुळे तात्काळ ही प्रक्रिया करून त्यांना या सवलतीत घ्यावे व त्यांना फार्मर आयडी तात्काळ द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राहुल शितोळे यांनी केले आहे

## जिल्ह्यातून हद्दपार असलेला वाळू माफिया जेरबंद

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यासह जिल्ह्यामध्ये अनेक गुन्हे दाखल असलेला त्याच बरोबर गेवराई तालुक्यात अवैध वाळू उपसा यासह इतर गुन्हे गेवराई,




चकलांबा पोलीस ठाण्यात दाखल असलेला वाळू माफिया सुरज विठ्ठल ढाकणे रा.मुंगी ता.शेवगाव जि.अहिल्यानगर यांच्याविरोधात एमपीडी अंतर्गत कारवाईसाठी तत्कालीन पोलीस अधिक्षक उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत कारवाई करण्यात आली आहे. तत्कालीन नारायण एकशिंगेच्या काळात नव्हे तर त्या अगोदरही हा वाळू माफिया आपली दहशत जमवून होता. खुनाचा प्रयत्न, दरोडा टाकणे, जाळपोळ करणे, गौण खनिज, वाळूची चोरी करणे, सरकारी कामात अडथळा असे गुन्हे दाखल असलेल्या वाळू माफियाला स्थानिक गुन्हे शाखेने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करून थेट हर्सूल कारागृहात रवानगी केली आहे. त्यामुळे स्थानिक गुन्हा शाखेचे जिल्हाभरात कौतुक केले जात आहे.

## पीएम किसानचा २० वा हप्ता जारी करण्यापूर्वी केंद्र सरकारचा अलर्ट

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याच्या प्रतिक्षेत देशभरातील कोट्यवधी शेतकरी आहेत. पीएम किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याचे २००० रुपये कधी मिळणार याकडे शेतकऱ्याचं लक्ष लागलं आहे. या दरम्यान पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील खात्यावरुन शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. अनोळखी लिंक, कॉल आणि मेसेजेस यापासून शेतकऱ्यांनी सावध राहाव, असं आवाहन करण्यात आलं आहे. याशिवाय पीएम किसान सन्मान निधीची अधिकृत वेबसाईट आणि



पीएम किसान सन्मान निधीचं एक्स प्लॅटफॉर्मवर योजनेसंबंधातील खऱ्या अपडेटस मिळतील असं सांगण्यात आलं आहे.

शेतकरी भाऊ आणि बहिणींनी पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या नावावर सोशल मीडियावर पसरवण्यात येत असलेल्या खोट्या माहितीपासून सावध राहा. अपडेटस वर विश्वास ठेवा. खोट्या लिंक, कॉल आणि मेसेजपासून दूर राहा, असं आवाहन शेतकऱ्यांना करण्यात आलं आहे. पीएम किसान सन्मान निधीच्या अपडेट अधिकृत सोशल मिडिया प्लॅटफॉर्म ाङ्गिळीरपेषषळललळरश्र वरुन मिळवा असं आवाहन करण्यात आलं आहे.

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या दहाव्या राष्ट्रीय अधिवेशनास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे-अर्जुन दळे

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे राष्ट्रीय अधिवेशन ७ ऑगस्ट रोजी गोवा येथे संपन्न होत आहे. या अधिवेशनाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह विविध मंत्री व नेते उपस्थित राहणार आहेत. तरी या अधिवेशनास बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त ओबीसी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी केले आहे.



गोवा येथील पणजी दिनदयाल उपाध्याय स्टेडियम मध्ये अधिवेशनाचे उद्घाटन होईल. अधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे, कॉंग्रेस विधिमंडळ पक्षनेते माजी मंत्री विजय वडेट्टीवार, खा.प्रतिभा धानोरकर, खा.डॉ.नामदेव किरसाण, आ.अभिजीत वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.परिणय फुके आणि अन्य राज्यातील ओबीसी नेते उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय अधिवेशनाला हजारो ओबीसी बांधव उपस्थित राहतील अशी माहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अर्जुन दळे यांनी दिली आहे. अधिवेशनात ओबीसींच्या जातीय जनगणनेचा व नॉन क्रिमिलियरचा आवाज बुलंद करण्याचा निर्धार राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी केला आहे. केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना तत्काळ करावी, आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यावरून हटवावी व लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे, त्याच प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतूद करून स्वतंत्र केंद्रीय मंत्रालयाची स्थापना करावी, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय आरक्षण पर्वत लागू करावे, क्रिमिलेयरची अट रद्द करून तोपर्यंत ही मर्यादा वीस लाख रुपये करावी यासह अन्य मागण्यावर अधिवेशनात चर्चा करण्यात येणार आहे.

## आता माझ्या नवऱ्याला न्याय मिळेल अशी अपेक्षा -ज्ञानेश्वरी मुंडे

परळी । प्रतिनिधी

परळीतील व्यापारी महादेव मुंडे महादेव मुंडे प्रकरण विधानसभेत गाजल्यानंतर यावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.आता मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरावरून आता माझ्या नवऱ्याला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे.आता या प्रकरणातील आरोपींना एसपीनी तात्काळ अटक करावे अशी प्रतिक्रिया ज्ञानेश्वरी मुंडे यांनी दिलीय.



पतीच्या हत्या प्रकरणात न्याय मिळावा या मागणीसाठी परळीतील मृत महादेव मुंडे यांच्या पत्नीने विषारी द्रव प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरु होते. दरम्यान, महादेव मुंडेंच्या तपासाचा मुद्दा विधानसभेत गाजल्यानंतर त्यावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. त्यावर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी प्रतिक्रीया दिलीय.

## वाढदिवसाला तलवारीने केक कापला,दोघे पोलिसांच्या ताब्यात

बीड । प्रतिनिधी

वाढदिवसाला हातात एक,दोन नव्हेतर तीन तलवारी हातात घेऊन केक कापणे महागात पडले.गावामध्ये आपला दरारा कायम राहावा, आपलं वजन रहावे यासह इतर कारणासाठी ठीक ठिकाणी वेगवेगळे ट्रेंड चालवले जात आहेत, यातच आता अनेक जण तलवारीने केक कापून ते फोटो सोशल मीडियावर व्हायरल करताना दिसतात. असाच काहीसा प्रकार दिंद्रुड पोलीस ठाणे हद्दीत घडला होता, याचे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झाले. याची माहिती पोलिसांना मिळतात पोलिसांनी संबंधितांवर गुन्हे नोंद करत तीन तलवारी जप्त केल्या. या कारवाईमुळे भविष्यात जिल्ह्यामध्ये अशा घटनांना नक्कीच आळा बसेल.



दिंद्रुड पोलीस ठाणे हद्दीत मौजे उमरी, ता. माजलगाव येथील अनिल जनार्धन शिंदे याचा वादिवस होता. सदर वाढदिवसानिमित्त उमरी गावात मित्रंडळीसह रात्रीच्या वेळी डीजेवर नाचण्यासह तलवारीने केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. सदर वाढदिवस कार्यक्रमास अनिल शिंदे याचे काही मित्र उपस्थित होते. आपले गावातील व परीसरातील वजन दाखविण्यासाठी वाढदिवसाचा केक तलवारीने कापण्यात आला. सदर कार्यक्रमाचे फोटो काढण्यात आले तसेच सदरचे फोटो सुनिल जनार्धन शिंदेच्या भावाने फेसबुकवर अपलोड केले होते. याची माहिती दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांना मिळाल्यानंतर त्यांनी सदर फोटोबाबत माहिती मिळविली असता सदरचा वाढदिवस हा पोलीस ठाणे हदीत १५/०७/२०२५ रोजी रात्री २.३० च्या समारास पार पडला असल्याचे समजले. तसेच सदर फोटोमध्ये तीन तलवारीव्दारे केक कापणाऱ्या चार व्यक्ती नामे१) अनिल जनार्धन शिंदे वय २४वर्षे, २) महादेव प्रताप प्ररिदे,वय २२ वर्ष दोन्हीरा उमरी ता. माजलगाव, २) विशाल गवळी, रा. पिपळगाव (नाखला), ता. त माजलगाव, ४) दादा म्हस्के, रा पात्रुड, ता. माजलगाव असल्याचे निष्पन्न झाले. तसेच तलवारीने केक कापल्याबाबतचे सदर वाढदिवसाचे फोटो दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने अनिल शिंदेचा भाऊ सनिल जनार्धन शिंदे, रा. उमरी, ता. माजलगाव यानेत्याच्या फेसबुक या सोशल मिडीयावर शेअर केले. म्हणृन वरील पाचही जनांवर गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या एकुण ०३ तलवारी जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनित कॉंवत, अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, पोलीस उपअधिक्षक निरज राजगुरु यांच्या मर्गदर्शनाखाली महादेव’ ढाकणे, पोउपनि. संजयकुमार राठोड, नंदकुमार वाघमारे, युवराज श्री डोळे, कैलास पोटे यांनी केली.

## अरण तीर्थक्षेत्रासाठी महायुती सरकारकडून १५०.२३ कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर!

बीड । प्रतिनिधी

संत शिरोमणी श्री सावता महाराज यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र अरण (ता. माढा, जि. सोलापूर) येथील संजीवन समाधी विकासासाठी ग्रामविकास विभागामार्फत १५०.२३ कोटी रुपयांचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंत्रीमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. ही अत्यंत आनंददायक व अभिमानास्पद बाब असल्याचे महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतीश शिंदे यांनी म्हटले आहे. त्यांनी मुख्यमंत्री आणि संबंधित सर्व मंत्र्यांचे महात्मा फुले युवा दलाच्या वतीने आभार मानले आहेत.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, मंत्री ना.अतुल सावे, व मंत्री ना.जयकुमार गोरे मंत्री ना.छगनराव भुजबळ यांचे महात्मा फुले युवा दलाच्या वतीने ॲड. सतीश शिंदे यांनी आभार मानले आहेत. सन २०२४ मध्ये श्रीक्षेत्र अरण येथे पार पडलेल्या भूमिपूजन सोहळ्यात तत्कालीन उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी ‘अ’ वर्ग दर्जा व तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची घोषणा केली होती. सावता महाराजांच्या समाधी सोहळ्या दरम्यान माळी समाजाने केलेले प्रभावी शक्ती प्रदर्शन व समाजबांधवांचा मोठा सहभाग पाहून मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी अरण तीर्थक्षेत्राच्या सर्व मागण्यांना मान्यता देत तीर्थक्षेत्र विकासाला गती देत त्याचीच पूर्तता म्हणून आज एक वर्षाच्या कालावधीतच मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पूर्ण केला आहे. हे यश संपूर्ण समाजाचे आहे! या निधीमुळे श्री क्षेत्र अरणच्या सर्वांगीण विकासाला आता नवे रूप मिळणार असल्याचे ॲड. सतीश शिंदे यांनी म्हटले आहे.

संघर्ष यात्रा
सोमवार दि.२१ जुलै
Monday Date 21 Jully 2025


# पैशाचा व्यवहार मिटविण्यास गेलेल्या मुकादमाला मारहाण

बीड । प्रतिनिधी

ऊसतोडीच्या आर्थिक व्यवहारासाठी गेलेल्या मुकादमाला चार जणांनी रस्त्यात अडवून मारहाण केली. मोबाईल हिसकावून घेत, पाठीवर दगड मारत खिशातील दोन लाख रुपये रोख जबरदस्तीने काढून घेतले. तसेच मोटारसायकलची चावी हिसकावून दुचाकीसह पळ काढल्याची घटना १८ जुलै रोजी घाटसावळी रोडवरील म्हातारा म्हसोबा कमानीजवळ घडली. या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुदाम धोंडीराम पवार(वय४०, रा.चाहरतांडा, तालखेड, ता.माजलगाव) हे ऊसतोड मुकादम असून त्यांनी यावर्षी मिनेश क्षीरसागर यांना चार लाख रुपये उलच दिली होती. तसेच मिनेशकडे अशोक कानडे यांची मागील वर्षीची थकबाकी असल्याने त्या व्यवहाराच्या मिटवणुकीसाठी सुदाम पवार, मिनेशची पत्नी आशा क्षीरसागर, समाधान क्षीरसागर व उत्तरेश्वर क्षीरसागर यांच्यासह म्हातारा म्हसोबा येथे कैलास क्षीरसागर यांच्या जेवणाच्या कार्यक्रमात गेले होते. व्यवहार न ठरल्यानंतर सुदाम पवार व आशा क्षीरसागर हे दुचाकीने तालखेडकडे परत जात असताना घाटसावळी रोडवर त्यांना नामदेव राठोड, गोविंद राठोड, बाजीराव राठोड(सर्व रा.लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी) आणि एक अनोळखी इसम यांनी अडवले. त्यांनी सुदाम यांचा मोबाईल हिसकावून घेतला, शिवीगाळ करत चापटबुक्क्यांनी मारहाण केली. बाजीराव राठोड याने त्यांच्या पाठीवर दगड फेकून मारला व खिशातील दोन लाख रुपये काढून घेतले. त्यानंतर मोटारसायकल घेऊन आरोपी पसार झाले. या प्रकरणी संबंधित चौघांविरोधात पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

## साहित्य भारतीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी प्रभाकर साळेगावकर तर कार्यवाहपदी डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय साहित्य परिषद सलग्न साहित्य भारती देवगिरी प्रांत जिल्हा शाखा बीडच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर तर कार्यवाह म्हणून उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर सरांची निवड करण्यात आली. अखिल भारतीय साहित्य परिषद संलग्न साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे यांच्या उपस्थितीमध्ये दि. १६ जुलै रोजी बीड जिल्ह्याची साहित्य भारतीची नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. या मध्ये अध्यक्षपदी प्रभाकर साळेगावकर,



कार्यवाह - डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, मंत्री - प्रशांत भानप, मार्गदर्शक - मधुकर वैद्य, स्नेहलताई पाठक, उपाध्यक्ष - सुरेश भानप, चंद्रकन्या सारसेकर,सह मंत्री - अशोक. डॉ. अशोक घोळवे, कोष/ कार्यालय प्रमुख - प्रा.अनंत देशपांडे, प्रचार प्रमुख - दत्ता आंबेकर,महिला प्रतिनिधी - मंजुषा कुलकर्णी, गौरी देशमुख, लता जोशी, डॉ.रुपाली कुलकर्णी, वाचक प्रतिनिधी - द. ल. वारे, स्मिता लिंबागावकर,युवा प्रतिनिधी - शांभवी जगदीश कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य - डॉ रमेश लांडगे, प्रा. सत्यप्रेम लगड, डॉ. श्रीमंत तोंडे, लक्ष्मण वाकडे, अशोक. दीपक देशमुख, प्रमोद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी युवराज नळे यांच्या हस्ते सर्व नवनिर्वाचित कार्यकारणीचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला लेखक साहित्य प्रेमी, वाचक यांची उपस्थिती होती.

## बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह आढळला

माजलगाव । प्रतिनिधी

शहराजवळ असलेल्या रेणापुरी येथील एक जण गुरुवारपासून बेपत्ता होता. त्याचा मृतदेह माजलगाव धरणाच्या खालील भागात असलेल्या सिंदफणा नदीपात्रात शनिवारी सकाळी आढळून आला.

रेणापुरी येथील रहिवासी नवनाथ बाबुराव चव्हाण(४०) हे गुरुवारी दुपारपासून बेपत्ता होते. शनिवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास धर्मराज मंदिराच्या मागे सिंदफणा नदीच्या पात्रात एक व्यक्तीचा मृतदेह असल्याचे या ठिकाणाहून जाणाऱ्या व्यक्तीला दिसले. त्याने याची माहिती पोलिसांना दिली. घटनास्थळी पोलिसांनी भेट देऊन पाहणी केली. नवनाथ चव्हाण यांना बाहेर काढले असता त्यांचा मृत्यु झाल्याने लक्षात आले.

## पारगावजवळ कार पलटी होऊन दोन ठार, दोन गंभीर जखमी

बीड । प्रतिनिधी

भरधाव वेगातील कार पलटी होऊन दोनजण जागीच ठार तर दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना आज शनिवारी पहाटे जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या पारगाव जवळ धुळे-सोलापूर महामार्गावर घडली आहे. जखमींवर उस्मानाबाद येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ऋषिकेश अवताडे (वय २७ वर्ष ) अजिंक्य लिंबे (वय २१ वर्षे) दोघेही रा. औरंगाबाद असे मयतांची नावे आहेत तर मयूर गवांडे (वय २५ वर्षे) रोहन जाधव (वय २४ वर्ष) हे गंभीर जखमी आहेत. हे तरुण कार एक्स यू व्ही ७०० क्रमांक एम.एच. २० एच बी ९७७६ मध्ये औरंगाबाद येथून तुळजापूर येथे जात होते. दरम्यान ते धुळे-सोलापूर महामार्गावरील पारगाव जवळ आले असता कार रस्त्याच्या खाली जाऊन पलटी होऊन घडलेल्या भीषण अपघातात दोघं जागीच ठार झाले तर दोघं गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांनी धाव घेत अपघात ग्रस्तांना मदत केली. जखमींना तातडीने उस्मानाबाद येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. अपघात घडल्यानंतर येथे काहीवेळ वाहतूक ठप्प झाली होती. नंतर महामार्ग पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. अपघात इतका भीषण होता की, कारचा चेंदामेंदा झाला आहे.

## भारतीय बौध्द महासभेच्या वर्षावास प्रवचन मालिकेचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

दी बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया शाखा जि.बीड (पश्चिम) च्या विद्यमाने दि.१० जुलै २०२५ कार्यालय भारतीय बौध्द महासभा बसस्टॅण्ड जवळ बीड येथे सकाळी ११ वाजता जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते वर्षावास प्रवचन मालिका व ग्रंथ वाचन करण्यात आले. सुरुवातीस अध्यक्षा व प्रमुख पाहुणे माजी राष्ट्रीय संघटक व्ही.एन.निसर्गन गुरुजी व पदाधिकारी यांच्या हस्ते आदर्शांचे पूजन झाल्यानंतर सामुदायिक वंदना घेवून कार्यक्रमाचे प्रास्ताविक फळके गुरुजी यांनी केले. तसेच शहरातील नागसेन नगर, पंचशील नगर, चक्रधर नगर, अजिंठा बौध्द विहार महाराष्ट्र हौसिंग कॉलनी, पुनर्वस्त कॉलनी, अंकुश नगर, प्रकाश आंबेडकरनगर आदी ठिकाणी ग्रंथ वाचन व प्रवचनाचे नियोजन करण्यात आले. दर रविवार व पौर्णिमेला केंद्रीय



शिक्षिका मार्फत प्रवचन राबविण्याचे ठरविले. कार्यक्रमास हानुमंत कांबळे, प्रशांत वासनीक, राजेंद्र ससाणे, पद्मीनताई गायकवाड, नवनाथ त्रिभवन, अनिल बोराडे गेवराई,निकाळजे बापू, कांताबाई जाधव इत्यादींनी विचार मांडले. शेवटी बौध्दाचार्य चव्हाण यांच्या आभार प्रदर्शनाने येथील कार्यक्रम संपन्न झाला.

तसेच अजिंठा बुध्दविहार म.हॉ.कॉलनी येथे जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते पूजन झाल्यानंतर सामुदायिक वंदना घेवून ग्रंथवाचन व वर्षावासाचे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी कांताबाई जाधव, त्रिशाला राऊत, पारवे ताई, ठोंबरे ताई, वासनीक ताई, पुष्पा साळवे, संजीवनी गडगे इत्यादींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी व्ही.एन.निसर्गन यांच्या मार्गदर्शनांनतर वार्ड शाखा म.हॉ.कॉलनी सर्वानीमते निवड करण्यात आली. अध्यक्ष नेहा अमोल पारवे, सरचिटणीस पुष्पा सतीष गवारे, कोषाध्यक्ष सरस्वतीताई जाधव, हिशोब तपासणीस अनुश्री धम्मा पारवे, उपाध्यक्ष संस्कार विभाग संध्या मस्के, पर्यटन उपाध्यक्षा जोत्सना हर्ष साळवे, संरक्षण उपाध्यक्ष वर्षा प्रमोद डोंगरे, सचिव संस्कार विभाग वर्षा कांबळे, पर्यटन सचिव सविता भालेराव, कार्यालयीन सचिव अनिता जाधव, संघटिका प्रमिला भोसले, रत्नमाला चांदमारे, जनाबाई कांबळे, मंदाताई सोनवणे, मिरा साळवे या प्रमाणे सर्वानुमते वार्ड शाखा निवड करुन सर्वांचे जिल्हा शाखेच्या वतीने स्वागत व अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे आभार मायाताई पारवे यांनी मानले सरणात्तयाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## तुलसी महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना आणि एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

बीड । प्रतिनिधी

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे गुरुवार, १७ जुलै रोजी रेड रिबन क्लब नोडल अधिकारी आणि पिअर एज्युकेटर्ससाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे मार्गदर्शन डॉ. संजय राऊत (जिल्हा शल्य चिकित्सक) यांनी केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात तुलसी महाविद्यालयात रेड रिबन क्लबची औपचारिक स्थापना करण्यात आली. याप्रसंगी डॉ. हनुमंत पारखे (बालरोग तज्ज्ञ), श्री. सुहास कुलकर्णी (जिल्हा कार्यक्रम अधिकारी), श्री. फासियोद्दीन फारुकी (मॉनिटरिंग ॲण्ड इव्हॅल्युएशन ऑफिसर), श्री. आर.सी. घनघाव (समुपदेशक, सुरक्षा क्लिनिक), श्रीमती. डी.जी. निकाळजे उपस्थित होते.

कार्यशाळेत एड्सचे कारण-लक्षणे, प्रतिबंध, समाजातील गैरसमज दूर करणे,



आर.जे. हिरवेकर (खउढउ समुपदेशक), श्री. जनार्धन माचपल्ले, श्री. नवनाथ चव्हाण (जिल्हा लेखा सहाय्यक) व प्राचार्य प्रा. युवकांची जबाबदारी, रेड रिबन क्लबची कार्यपद्धती व वर्षभराचे उपक्रम याविषयी सखोल पीपीटी सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी आरोग्यविषयक जनजागृतीसाठी पुढे यावे, यावर भर देण्यात आला. या उपक्रमात बीड जिल्ह्यातील ३० महाविद्यालयांतील रेड रिबन क्लब नोडल अधिकारी व पिअर एज्युकेटर्स सहभागी झाले. प्रशिक्षणार्थ्यांना भोजन, चहा आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्रीमती राजश्री हिवरेकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतासाठी खउढउ, डापकु, डीएसआरसी टीम, महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले.

## धाराशिव -बीड-छ.संभाजीनगर रेल्वे मार्गासाठी हवाई आणि जमिनी पाहणी सुरु

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या धाराशिव -बीड- छ. संभाजीनगर प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळायला सुरुवात झाली आहे. या प्रस्तावित रेल्वेमार्गाच्या हवाई आणि जमिनी पाहणीचे आदेश मध्य रेल्वेच्या वतीने देण्यात आले असून त्याचे कंत्राट देखील देण्यात आले आहे. शुक्रवारपासून या पाहणीला सुरवात झाली असून आणखी दोन दिवस ही पाहणी चालणार आहे.

बीड जिल्ह्यातील अहिल्यानगर-बीड -परळी या रेल्वेमार्गाचे काम आता गती घेत आहे. येत्या वर्षभरात हा फळेवे मार्ग पूर्ण करण्याचे घाटत असतानाच आता जिल्ह्यासाठी महत्वाच्या असलेल्या आणखी एका रेल्वेमार्गाला गती मिळणार असल्याचे चित्र आहे. अर्थसंकल्पात धाराशिव -बीड- छ. संभाजीनगर या रेल्वेमार्गाच्या सर्व्हेक्षणासाठी तरतूद करण्यात आली होती. तसेच हा प्रस्तावित रेल्वे मार्ग महत्वाचा असल्याने या मार्गाबाबत रेल्वे मंत्रालयाकडून संपूर्ण पाठपुरावा सुरु आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री आत्माराम पांडुरंग वाव्हळ यांनी सचिन ऑफसेट, सुभाष रोड, बीड येथे छापून साप्ताहिक संघर्ष यात्रा कार्यालय, गोविंद नगर धानोरा रोड बीड ता. जि. बीड (महाराष्ट्र)-४३ ११ २२ येथे प्रकाशित केले मो. ८२ ७५ २६ ८५ ८९ या अंकातील विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (बीड न्यायालय कक्षेत)